PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Vaishakh Vanva
Year: 1964

Song: Chandne Jhale Ga Keshari
Lyricist: G.D. Madgulkar

चांदणे
चांदणे...
झाले गं केशरी
केशरी
झाले गं केशरी
चांदणे...
झाले गं केशरी
झाले गं केशरी
पुसटण झाल्या तारा तोवर
पुसटण झाल्या तारा तोवर
अरूण उतरला घरी
चांदणे...
झाले गं केशरी

सरल्या काळया अबोल राती
नव चंद्रासम उगवे प्रिती
सरल्या काळया अबोल राती
नव चंद्रासम उगवे प्रिती
भाव पोर्णिमा अंती बहरे
भाव पोर्णिमा अंती बहरे
उभयांच्या अंतरी
चांदणे
चांदणे...
झाले गं केशरी
झाले गं केशरी

काल वाटली तुळस लाजरी
आज तिच्यावर दिसे मंजिरी
काल वाटली तुळस लाजरी
आज तिच्यावर दिसे मंजिरी
कृष्ण कडेवर घेई जणू हि
कृष्ण कडेवर घेई जणू हि
यशोमती सुंदरी
चांदणे
चांदणे...
झाले गं केशरी
झाले गं केशरी
मुक्या माऊली तुजसी सांगते
माझ्या ही ऊरी गुज रांगते
मुक्या माऊली तुजसी सांगते
माझ्या ही ऊरी गुज रांगते
सुखद वाटते गोवत्सांची
सुखद वाटते गोवत्सांची
म्हणूनी मला चाकरी
चांदणे
चांदणे...
झाले गं केशरी
झाले गं केशरी
चांदणे
चांदणे...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*